# प्रसिध्दीपत्र

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -०१ यांचे मार्फत **स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग इन्स्ट्रक्टर्स ॲण्ड स्टुडन्टस् (GCC-SSD-CTC) मार्च - २०२३** या विषयाची परीक्षा दि. ०६ मार्च २०२३ रोजी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. सदर परीक्षांचे प्रवेशपत्रे परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर संस्था लॉगिनद्वारे दि. 3 /०३/२०२३ पासून देण्यात आलेली आहेत.

संबंधित संगणक टंकलेखन संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेतील सर्व परिक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन शिक्का व स्वाक्षरीसह संबंधित परीक्षार्थ्यांना वितरीत करण्याची व्यवस्था करावी.

अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे सदर परीक्षेसाठी प्रवेशपत्र वितरीत केल्यानंतर विद्यार्थ्यांचे स्वत:चे नाव, आडनाव, वडिलांचे नाव/ पतीचे नाव, आईचे नाव, विषय बदल, फोटो बदल, केंद्र बदल इ.कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करुन दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर परीक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावरील फक्त स्पेलिंग दुरूस्ती असेल व विद्यार्थ्यांचे नाव, वडिलांचे नाव/ पतीचे नाव, आईचे नाव, आडनाव यात बदल होत नसेल तरच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयात (विद्यार्थ्यांचा फोटो व ओळखपत्रासह) समक्ष येऊन दंड रु. २००/- आकारुन प्रवेशपत्रावर दुरूस्ती करुन घ्यावी.

सर्व परीक्षार्थ्यांनी त्यांची ऑनलाईन प्रवेशपत्रे आपल्या संगणक टंकलेखन संस्थेतून परीक्षेपूर्वी हस्तगत करावित.

3/3/23

**(संगीता घोडेकर)**
**सहा.आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे -०१.**

**दिनांक :-** 3 **/ ०३/२०२३.**
**स्थळ :- पुणे**